खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील यांची फेरनिवड



खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वार्षिक सभेत अध्यक्ष निवडीनंतर सत्कार करताना पदाधिकारी.

**शिक्षण प्रसारक अध्यक्षपदी ॲड. बुट्टे पाटील**

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि. ३०) खेळीमेळीत पार पडली. यात पुढील पाच वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांची निवड करण्यात आली. आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, अनिल बाबा राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे आदी उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील हे या संस्थेचे सन २००१ पासून अध्यक्ष आहेत. त्यांच्या अध्यक्ष निवडीचा ठराव हिरामण सातकर यांनी मांडला. अनुमोदन विष्णूपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सर्वांना बरोबर घेऊन संस्थेचा कारभार पारदर्शकपणे करू, असे ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले. या वेळी सर्व संचालक मंडळ एकमताने निवडण्यात आले. अहवाल वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी आभार मानले.

लोकमत

# खेड शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. याप्रसंगी आमदार दिलीप मोहिते-पाटील, हिरामण सातकर, अनिल राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे, सर्व संचालक उपस्थित होते.



ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील हे या संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष आहेत.

या सभेने पुढील पंचवार्षिकसाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांच्या अध्यक्ष निवडीचा ठराव हिरामण सातकर यांनी मांडला; तर अनुमोदन विष्णुपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. यावेळी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, राजेश कांडगे यांनी विचार व्यक्त केले.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, एकमताने अध्यक्ष निवड करताना सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना बरोबर घेऊन या संस्थेचा पारदर्शक कारभार करणार असल्याचे सांगितले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांचे सहकार्य आवश्यक असून, भविष्यातील आव्हानांमधून मार्ग काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. लोकनेते शरदरावजी पवार यांचे या संस्थेवर विशेष प्रेम असून त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वार्षिक सभेत सर्व संचालक मंडळ एकमताने निवडण्यात आले. अहवाल वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Oct 03, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

# ‘खेड शिक्षण’च्या अध्यक्षपदी बुट्टे

**राजगुरुनगर, ता. ३० :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड झाली. मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२१ ते सन २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

मंडळाची वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या प्रसंगी आमदार दिलीप मोहिते, हिरामण सातकर, अनिल राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे, सर्व संचालक व संस्थेचे सभासद उपस्थित होते.



**ॲड. बुट्टे पाटील**

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील हे या संस्थेचे सन २००१ पासून अध्यक्ष आहेत. या सभेने पुन्हा त्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांच्या अध्यक्ष निवडीचा ठराव सातकर यांनी मांडला. तर, अनुमोदन विष्णूपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. या वेळी आमदार मोहिते, सातकर, कांडगे यांनी विचार व्यक्त केले.उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी अहवाल वाचन केले. मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी आभार मानले.

सर्वांना बरोबर घेऊन संस्थेचा पारदर्शक कारभार करणार असल्याचे बुट्टे पाटील यांनी सांगितले. तसेच, लोकनेते शरद पवार हे संस्थेचे आधारस्तंभ असून, त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

Pune, District-Today
01/10/2021 Page No. 5

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. १ ऑक्टोबर २०२१

# ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील सहाव्यांदा अध्यक्षपदी

**राजगुरूनगर, दि. ३० (प्रतिनिधी)**



- खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांची सहाव्यांदा निवड करण्यात आली.

४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ॲड देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यासभेला आमदार दिलीप मोहिते पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर मानद सचिव हरिभाऊ सांडभोर , हिरामण सातकर, अनिल राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे उपस्थित होते. ॲड. बुट्टे पाटील हे संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष आहेत. त्यांच्या निवडीचा ठराव हिरामण सातकर तर अनुमोदन विष्णूपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. ॲड. बुट्टे पाटील म्हणाले की, संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांचे सहकार्य आवश्यक असून भविष्यातील आव्हानांमध्ये मार्ग काढण्यात येईल. शरद पवार यांचे या संस्थेवर विशेष प्रेम असून त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध राहणार आहे. सभेत सर्व संचालक मंडळ एकमताने निवडण्यात आले.

# देवेंद्र बुट्टे पाटील सहाव्यांदा अध्यक्षपदी



राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिक कालावधीसाठी अध्यक्ष म्हणून ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या प्रसंगी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, अनिल राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे आदी उपस्थित होते.

ॲड. बुट्टे पाटील हे संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष असून, सहाव्यांदा त्यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. हिरामण सातकर यांनी अध्यक्ष निवडीचा ठराव मांडला. संस्थेच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय चालविले जात असून, महाविद्यालयात खेड, आंबेगाव तालुक्यातील सुमारे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. ॲड. बुट्टे पाटील म्हणाले, 'एकमताने अध्यक्ष निवड करताना सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना बरोबर घेऊन संस्थेचा कारभार पारदर्शकपणे चालविला जाईल.'

महाराष्ट्र टाईम्स

# नवराष्ट्र

## खेड तालुका शिक्षण मंडळ अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

राजगुरुनगर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, अनिल राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे, सर्व संचालक आणि मोठ्या संख्येने संस्थेचे सभासद उपस्थित होते. ॲड. बुट्टेपाटील हे या संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष आहेत. या सभेने पुढील पंचवार्षिकसाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. अध्यक्ष निवडीचा ठराव हिरामण सातकर यांनी मांडला. तर अनुमोदन विष्णूपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. आ.दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, राजेश कांडगे यांनी विचार व्यक्त केले. अहवाल वाचन नानासाहेब टाकळकर यांनी केले.



Pune Plus Edition
02 October 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com

पुणे आवृत्ती बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द
RNI No. MAHMAR/2013/57952
, दि. १ ऑक्टोबर २०२१ • वर्ष : ९ • अंक : १४ • पाने ८ • किंमत २ रुपये www.

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष

# ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड

**राजगुरुनगर**
**जनप्रवास प्रतिनिधी**



येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून ॲड देवेंद्र बुट्टेपाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. व सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या प्रसंगी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, अनिल (बाबा) राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे, डॉ. अनिल खिवंसरा व सर्व संचालक आणि संस्थेचे सभासद उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील हे या संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष आहेत. या सभेने पुढील पंचवार्षिकसाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांच्या अध्यक्ष निवडीचा ठराव हिरामण सातकर यांनी मांडला. तर अनुमोदन विष्णूपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. या वेळी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, राजेश कांडगे यांनी मनोगत व्यक्त केले.

या वार्षिक सभेला संबोधित करताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, एकमताने अध्यक्ष निवड करताना सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना बरोबर घेऊन या संस्थेचा पारदर्शक कारभार करणार असल्याचे सांगितले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांचे सहकार्य आवश्यक असून भविष्यातील आव्हांनांमधून मार्ग काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. लोकनेते शरदरावजी पवार यांचे या संस्थेवर विशेष प्रेम असून त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वार्षिक सभेत सर्व संचालक मंडळ एकमताने निवडण्यात आले. संस्थेच्या अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. १ ऑक्टोबर २०२१

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून ॲड देवेंद्र बुट्टेपाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. व सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या प्रसंगी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, अनिल (बाबा) राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे, सर्व संचालक आणि संस्थेचे सभासद उपस्थित होते.



ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील हे या संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष आहेत. या सभेने पुढील पंचवार्षिकसाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांच्या अध्यक्ष निवडीचा ठराव हिरामण सातकर यांनी मांडला. तर अनुमोदन विष्णूपंत बोऱ्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. या वेळी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, राजेश कांडगे यांनी मनोगत व्यक्त केले.

या वार्षिक सभेला संबोधित करताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, एकमताने अध्यक्ष निवड करताना सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना बरोबर घेऊन या संस्थेचा पारदर्शक कारभार करणार असल्याचे सांगितले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांचे सहकार्य आवश्यक असून भविष्यातील आव्हांनांमधून मार्ग काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. लोकनेते शरदरावजी पवार यांचे या संस्थेवर विशेष प्रेम असून त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वार्षिक सभेत सर्व संचालक मंडळ एकमताने निवडण्यात आले. संस्थेच्या अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

केसरी

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे पाटील यांची निवड

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या पंचवार्षिकसाठी अध्यक्ष म्हणून ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सहाव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. व सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या प्रसंगी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, अनिल राक्षे, किरण मांजरे, राजेश कांडगे, सर्व संचालक आणि संस्थेचे सभासद उपस्थित होते.



ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील हे या संस्थेचे २००१ पासून अध्यक्ष आहेत. या सभेने पुढील पंचवार्षिकसाठी त्यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांच्या अध्यक्ष निवडीचा ठराव हिरामण सातकर यांनी मांडला. तर अनुमोदन विष्णूपंत बोन्हाडे, ॲड. बाळासाहेब लिंभोरे यांनी दिले. यावेळी आमदार दिलीप मोहिते पाटील, हिरामण सातकर, राजेश कांडगे यांनी मनोगत व्यक्त केले.

या वार्षिक सभेला संबोधित करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, एकमताने अध्यक्ष निवड करताना सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना बरोबर घेऊन या संस्थेचा पारदर्शक कारभार करणार असल्याचे सांगितले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांचे सहकार्य आवश्यक असून, भविष्यातील आव्हानांमधून मार्ग काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. लोकनेते शरदरावजी पवार यांचे या संस्थेवर विशेष प्रेम असून त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वार्षिक सभेत सर्व संचालक मंडळ एकमताने निवडण्यात आले. संस्थेच्या अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**